माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वयेदाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२५/M/०००९५५**
**अपील क्र. MHSICMU/२०२५/M/०००९५६**

**अपिलार्थी डॉ. जयाराजा बोलार पुत्रन**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी**
कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ/म्हाडा, मुंबई यांचे कार्यालय,
गृहनिर्माण भवन,पोटमाळा, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१

**प्रथम अपिलीय अधिकारी**
कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ/म्हाडा, मुंबई यांचे कार्यालय,
गृहनिर्माण भवन, पोटमाळा, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २६.०५.२०२६</u>**

अपीलकर्ता : उपस्थित(व्ही.सी.व्दारे)
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २३.०३.२०२३ | | ११.०७.२०२३ | |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०६.१०.२०२३ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केलेले नाहीत असे कारण नमूद करुन राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ, नवी मुंबई यांच्या कार्यालयाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ, नवी मुंबई यांच्या कार्यालयाने दि. ११.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सदर व्दितीय अपील राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई यांच्याकडे वर्ग केले.

२. अपिलार्थी यांनी दि. २३.०३.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *"प्लॉट नं. ६७, RSC- १५, वीर सावरकर नगर, ठाणे- ४००६०६ मधील सर्व कागदपत्रांची छायांकित प्रत मिळण्याबाबत."*

जन माहिती अधिकारी यांनी उत्तर न दिल्याने अपिलार्थींनी दि. ११.०७.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले.

३. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी (व्ही.सी. माध्यमाव्दारे), जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, त्यांना ३ वर्षामध्ये जन माहिती अधिकारी यांनी काहीही कळविलेले नाही व माहिती देण्यात आलेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतलेली नाही.

..२/-

४. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा लेखी खुलासा दि. २६.०५.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, डॉ. जयाराज बोलार पुत्रन यांचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज मिळकत व्यवस्थापक-१/कोंकण मंडळ कार्यालयास झाला होता. सदरहू अर्जात प्लॉट क्र. ६७ ६८, आर.एस.सी. १५, वीर सावरकर नगर ठाणे बाबतची माहिती मागविण्यात आली होती. परंतू सदर प्लॉट क्र. ६७ व ६८ ची नस्ती कार्यालयात आढळून येत नसल्याने अर्जदारास मौखिक रित्या कळविण्यात आले होते की, सदर नस्तीचा शोध अद्याप कार्यालयात चालू आहे सापडल्यानंतर आपणांस कळविण्यात येईल. तद्नंतर कामाचा व्याप तसेच दरम्यान तब्येत खराब असल्याने नजरचूकीने अर्जदारास उत्तर देता आले नाही व त्यामध्ये कोणताही हेतू नव्हता. तद्नंतर माझी कोंकण मंडळ कार्यालयातून इतर विभागात बदली झाल्याने दि. १६.१२.२०२४ रोजी मला कोंकण मंडळ कार्यालयातून कार्यमुक्त करण्यात आले आहे. यापुढे अशी चुक होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. तरी कृपया अर्जदाराने मागितलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्याकरीता एक संधी देण्यात यावी, ही नम्र विनंती.

५. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा लेखी खुलासा दि. २६.०५.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, अर्जदाराने सादर केलेला दि. ११.०७.२०२३ रोजीचा प्रथम अपील अर्ज जन माहिती अधिकारी यांना वर्ग करण्यात आलेला आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी सदर प्रकरण सुनावणीसाठी सादर केले नसल्याने सुनावणी होऊ शकली नाही. त्यामूळे अर्जदाराने सादर केलेल्या अपीलावर सुनावणी घेवून निर्णय निर्गमित केलेला दिसून येत नाही. याबाबत मी मा.राज्य माहिती आयोगाची माफी मागतो. तसेच सदर कालावधीत माझ्याकडे मिळकत व्यवस्थापक-१/ कोकण मंडळ या पदाच्या कामकाजा व्यतिरिक्त उप समाजविकास अधिकारी व भांडार नियंत्रक या पदांचाही अतिरिक्त कार्यभार होता. तसेच प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत खोणी शिरढोण येथील सदनिका वितरण व ताबा देणेबाबतची प्रक्रिया सुध्दा सूरू होती. यास्तव प्राप्त अपीलाबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठपुरावा करण्याबाबत व अपीलाबाबत सुनावणी घेवून त्यावर आदेश पारीत करण्याचे अनावधानाने राहून गेले आहे. तरी वरीलप्रमाणे खुलासा ग्राहय धरून झालेल्या चुकीबद्दल क्षमा असावी व सदर प्रकरणी झालेली चूक क्षमापित करणे बाबत मा. आयोगास नम्र विनंती आहे.

६. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, माहिती अर्जात नमुद नस्ती त्यांच्या अभिलेखावर उपलब्ध होत नाही. त्यांनी मान्य केले की, सदर नस्ती कायमस्वरुपी जतन करण्याची नस्ती आहे. तसेच त्यांनी सदर नस्त्यांचा शोध घेण्यासाठी वेळेची मागणी केली.

७. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अभिलेखात शोध घेऊन अपिलार्थींनी मागणी केलेल्या माहितीसह उपस्थित रहावे व अपिलार्थींनी मागणी केलेली नस्ती उपलब्ध होत नसेल तर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियमाच्या तरतुदीनुसार संबंधीत पोलीस ठाणे येथे एफआयआर नोंदवून एफआयआरच्या प्रतीसह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर दोन्हीही प्रकरणी पुढील सुनावणी दि. १७.०६.२०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

प्रदीप व्यास 27-5-2026

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २७.०५.२०२६**